ठाणे महानगरपालिका, ठाणे

महानगरपालिका भवन, सनसेनानी अरुण कुमार वैद्य मार्ग, पांचपाखाडी ठाणे (प)-४००६०२.

संदर्भ : ठामपा/पा.पु.वि./अति.न.अभि./ ५४ दिनांक : 23/6/2022

विकास प्रस्ताव क्र. S०४/०१६३/११ (जुना विकास प्रस्ताव क्र.८८/१४२)
वापर परवान्यासाठी पाणी पुरवठा विभागाचा ना हरकत दाखला
(इमारत क्र.८ हरबेलिया (३ लेव्हल पोडीयम + स्टील्ट + फलोरच्या वर स्टील्ट + १ ते २६ मजले करीता)

प्रति,
मे.स्केप्स् आर्किटेक्टस्
गुप्ते कॉटेज, भक्ती मंदिरा समोर,
पाचपाखाडी,
ठाणे (प).

विषय:-पाणी पुरवठा विभागाचा वापर परवान्याकरीता ना हरकत दाखला मिळणेबाबत.

संदर्भ:-विकास प्रस्ताव क्र. S०४/०१६३/११ सी.सी.नं.टीएमसी/टीडीडी/१४६ दि.०२.०२.२०१८.

उपरोक्त विषयास अनुसरुन सदर नविन विकास प्रस्ताव क्र. S०४/०१६३/११ , सेक्टर ७ मधील इमारत क्र.८ हरबेलिया (३ लेव्हल पोडीयम + स्टील्ट + फलोरच्या वर स्टील्ट + १ ते २६ मजले) सब प्लॉट अे. लॅण्ड बेअरिंग गट नं.६१/१, २, २, ४, ६१/२/१, २, ३ चितळसर गांव, मानपाडा ता. व जि. ठाणे या वापर परवान्याकरीता पाणी पुरवठा विभागाचा ना हरकत दाखल्याची मागणी केली आहे. त्यानुसार खालील अटी व शर्तीस अधिन राहून संबंधितांना शहर विकास विभागामार्फत वापर परवाना देण्यास पाणी पुरवठा विभागाची हरकत नाही.

१. महनगरपालिकेच्या पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा होईपर्यंत सदर विकास प्रस्तावातील इमारतींना ठाणे महानगरपालिकेमार्फत पाणी पुरवठा करता येणार नाही.
२. सदर इमारतीस वापर परवाना मिळाल्यानंतर व वॉटर डिस्ट्रीकटमध्ये पाणी पुरवठयात सुधारणा झाल्यावर ठाणे महानगरपालिकेमार्फत फक्त पिण्यासाठी पाण्याच्या उपलब्धतेनुसार पाणी पुरवठा करण्यात येईल.
३. इमारती संयोजने दिल्यास त्याचा परिणाम इतर भागातील पाणी पुरवठयावर होत असल्याचे निदर्शनास आल्यास संयोजनाचा आकार कमी करणे / खंडीत करणेचा अधिकार महापालिकेस राहील व त्यास विकासक/ वापरकर्ता यांना कोणतीही हरकत घेता येणार नाही.
४. मुद्दा क्र. १ नुसार वितरण व्यवस्थेतील सुधारणा झाल्यानंतर महापालिकेमार्फत भविष्यात करण्यात येणारा पाणी पुरवठा फक्त पिण्यासाठी (नियमानुसार ९० लिटर्स प्रति दिन प्रति व्यक्ती) व पाण्याच्या उपलब्धतेनुसार करण्यात येईल.
५. पिण्याच्या व्यतिरिक्त विविध प्रकारच्या इतर व्यावसायिक वापरासाठी स्वतंत्र संयोजने घेणे विकासक / वापरकर्ता यांना बंधनकारक राहील.
६. संकुलातील अंतर्गत समान वितरणाची संपूर्ण जबाबदारी विकासक / वापरकर्ता यांची राहील.
७. ठा.म.पा. ठराव क्र. १३८ दि. १८.०१.२००५ अन्वये संकुलात बोअरवेल व वर्षा जलसंचयन व विनियोग यंत्रणा (रेनवॉटर हार्वेस्टींग) राबविणे व सुस्थितीत ठेवणे बंधनकारक राहील. अन्यथा भविष्यात नळ संयोजन देण्यात येणार नाही / देण्यात आलेले नळ संयोजन खंडीत करण्याचा अधिकार महापालिकेस राहील.
८. संबंधित इमारत नियोजित सहकारी संस्थेच्या ताब्यात देताना इमारतीसाठी राबविण्यात आलेल्या वर्षा जलसंचयन व विनियोग व्यवस्थेच्या परिचलनाचे प्रशिक्षण नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पदाधिका-यांना देणे विकासकावर बंधनकारक राहील.
९. मलनि:सारण व्यवस्थेसाठी कायमस्वरुपी विहीर/कुपनलिकेचे पाणी वापरण्यात यावे. कोणत्याही परिस्थितीत पिण्याच्या पाण्याचा वापर करु नये.
१०. ठाणे महानगरपालिकेमार्फत वापर परवाना न घेता सदर इमारत वापरत असल्यास त्यासाठीच्या पाणी पुरवठयाची व्यवस्था ही विकासक / वापरकर्त्यास महापालिकेव्यतिरिक्त इतर माध्यमातून स्वत:च्या जबाबदारी व स्वखर्चाने करावी लागेल.
११. मलनि:सारण व्यवस्थेसाठी कायमस्वरुपी विहीर/कुपनलिकेचेच पाणी वापरण्यात यावे. त्यासाठी उपाययोजना उदा.बोअरवेल, एस.टी.पी. योजनेचा वापर करणे कोणत्याही परिस्थितीत पिण्याच्या पाण्याचा वापर करु नये.

१२. साठवण टाकी जमिनीखालीच असणे आवश्यक असुन नळ संयोजन जमिनीच्या पातळीवरुन साठवण टाकीत जाईल याची दक्षता घ्यावी.

१३. जमिनीखालील साठवण टाकीस पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी महापालिकेची असुन अंतर्गत जलवितरणाची संपूर्ण जबाबदारी संबंधितांची राहील.

१४. नळ संयोजनाला मीटर बसविणे व ते बसवताना रिडींग घेणे सोयीस्कर होईल अशा जागी बसविणे, कायमस्वरुपी चालू स्थितीत ठेवणे, रिडींग घेण्यास उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

१५. आपत्कालीन वेळी जमिनीखालील पाण्याच्या साठवण टाकीकडे जाणा-या मार्गावर टँकरची ने आण करुन पाणी पुरवठा करण्यासाठी कायम स्वरुपी मार्ग मोकळा करणे बंधनकारक राहील.

१६. बोअरवेल व वर्षा जनसंचयन व विनियोग यांचे काम पुर्ण करुन कार्यान्वित ठेवणे विकासक/सोसायटी यांना बंधनकारक राहील.

१७. ठाणे महानगरपालिका ठराव क्र. ९० दिनांक २०.०६.२०१३ अन्वये इमारतीच्या सदनिकांचे किचन व बाथरुनसाठी वापरण्यात येणारे पाणी री सायकल करुन फलशिंग व गार्डनिग इत्यादीकरीत वापर करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित करणे संबंधितांवर बंधनकारक राहील.

वरील अटी व शर्तींचे भविष्यात केव्हाही उल्लंघन झाल्यास कोणतीही पुर्व सुचना दिल्याशिवाय पाणी पुरवठा खंडीत करण्याचे अधिकार महापालिका राखुन ठेवित आहे.

THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

अति.नगर अभियंता
पाणी पुरवठा विभाग
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

प्रत :- शहर विकास विभाग, ठामपा, ठाणे.
वरील अटी व शर्ती शहर विकास विभागामार्फत वापर परवाना देताना घालण्यात याव्यात.